सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महत्वाचे / कालमर्यादीत**

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२५/ 1494

**प्रति,**

दिनांक :- 26 MAY 2025

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील विद्यमान तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :-** मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/IntakeApp/२०२५/४१८दि. २३/०५/२०२५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार आहे.

त्यानुषंगाने आपल्या संस्थेबाबत पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संबंधीत शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता व त्यानुसार संबंधीत विद्यापिठ यांचेकडून संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुबई यांचे मान्यता पत्र व तसेच त्यासोबतची संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या https://ugpg25.dtemaharashtra.gov.in/ या लिंकवर अद्ययावत करुन ऑनलाईन पध्दतीने सादर करावी. तसेच आपल्या लॉगिनमधुन अद्ययावत केलेली प्रिन्ट व त्यासोबत वरील नमुद कागदपत्रासह सोबत जोडलेल्या वेळापत्रकाप्रमाणे जिल्हानिहाय व अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांनी पडताळणीकरीता उपस्थित राहावे. वेळापत्रकामध्ये नमुद दिनांकास उपस्थित न राहिल्यास आपली माहिती पडताळणी करुन प्रवेश क्षमता अद्यावत केली जाणार नाही, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता, ती विहीत कालावधीत व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. याबाबत संस्थांना https://ugpg25.dtemaharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर (प्रणालीवर) सर्व संस्थांनी माहिती भरावी.

मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रिये दरम्यान जागा वाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण अद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधीत संस्थेचे प्राचार्य / संचालक जबाबदार राहतील. तसेच सदर माहिती या कार्यालयाव्दारे Online Approved केल्यानंतर त्याची पडताळणी करावी व त्यात काही बदल असल्यास तात्काळ कळविण्यात यावे.

सदर विषयाबाबत आपल्या संस्थेनी करावयाच्या कार्यवाहीसंबंधी विस्तृत सूचना व संदर्भीय पत्र यासोबत जोडलेल्या आहेत.

**सहपत्र :-** वरील प्रमाणे.

(मनोज म. अंधारे)
**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्राशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना कळविण्यात येते की, सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने विशेष दक्षता घेवून online approved करावे तसेच संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

# प्रपत्र

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत संस्थांनी या कार्यालयात उपस्थित राहावयाचे वेळापत्रक

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | जिल्हा | उपस्थित राहावयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | **सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था** | बुलढाणा | ०२/०६/२०२५ |
| | | वाशिम | ०३/०६/२०२५ |
| | | यवतमाळ | ०४/०६/२०२५ |
| | | अमरावती | ०५/०६/२०२५ |
| | | अकोला | ०६/०६/२०२५ |

(मनोज म. अंधारे)
**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

e:\office letter misc-13.docx167